
जो - तो

वागले लोक कसेही, मी सावरून घेतो
रंग उडाल्या प्रसंगांचे, मी आवरून घेतो ॥ १ ॥

कसे कोणी बोलला, हा पाहावा; कि शब्द तो
उरात आणखी अनुभव; एक, मी माववून घेतो ॥ २ ॥

देतो दाखले कोणी, कसा होता काळ तो
भुलतो मी हि मग; अन, तो मात्र वापरून घेतो ॥ ३ ॥

एकदा बोलावे वाटले, करावा हिशोब तो
हाच फरक माझ्यात काय, कि मी राहवून घेतो ॥ ४ ॥

एकदा झाला जसा, जरा बदल माझ्यात तो
मग समजले इतुकेवरी, का मी चालवून घेतो ॥ ४ ॥

समजले त्यांचे तयांना, न उरला काळ तो
भेटतो जो तो आता, बोलतो; नजर चोरून घेतो ॥ ५ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78